Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

Guest Editor :
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

Associate Editors -
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar**, BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
October-2019


| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि भारत | डॉ. केशव लहाने | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | डॉ. किरण चक्रे | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | डॉ. राखी सलगर | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | डॉ. रमेश वाघमारे | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | डॉ. साहेब राठोड | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | डॉ. सिद्धेश्वर सटाले | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. डी.एस.शिंदे | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | डॉ. शिवाजी चौगुले | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | डॉ. शिवराज पाटील | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुनिल जाधव | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | डॉ. सुरेश सामाले | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | डॉ. टी.आर.फिसफिसे | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | गौरव पाटील | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | डॉ. संदीपान गायके | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | डॉ. जे.एस.ढवळे | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | डॉ. जयसिंग सिंगल | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | प्रा. नंदकुमार कुकलारे | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. जयदेव मोहिते | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. जिरेवाड सर यांचे योगदान | नितीन क्षीरसागर | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. सय्यद मुसा | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | डॉ. अनंत नरवडे | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य सामाजवादातील आर्थिक विचार | प्रा. वितेश निकते | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | प्रा. भारत पल्लेवाड | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | डॉ. किरण पिनाटे | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | प्रा. आर.एस.पोपळघट | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. एच.आर.खेत्री | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | डॉ. आर.के.काळे | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | प्रा. संदिप परदेशी | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | प्रा. इंदू साळुंके | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | प्रा.एल.एस.सिताफुले | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | डॉ. दत्ता तंगवलवाड | 579 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील सामाजिक समस्यांचे चित्रण

**प्रा. संदीप परदेशी**
सहाय्यक प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

साहित्य हे समाजाचा आरसा असते. साहित्यकृती तयार होत असतांना लेखक त्याच्या अवती - भोवतीचा परिसर, त्याच्यावर झालेल्या संस्काराचे प्रतिबिंब साहित्यकृतीत पडत असते. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येक कलाकृती वेगवेगळी ठरते. अशाच अनेक विविध सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक, क्रीडा या विषयावंर साहित्यलेखन करणारे मराठवाड्यातील लेखक अखिल भारतीय मराठी साहित्य संमलेनाचे अध्यक्ष, एक उत्तम प्रशासकीय अधिकारी `लक्ष्मीकांत देशमुख` हे इतर साहित्य लेखकांपेक्षा वेगळे ठरतात.

उत्तम प्रशासकीय अधिकारी म्हणून लक्ष्मीकांत देशमुख आपणा सर्वांना परिचित आहेत. आपल्या प्रशासकीय पदाचा उपयोग लोक कल्याणासाठी करणे हा मानस समोर ठेवून ते समाजातील महत्वपूर्ण प्रश्नांना सतत भिडत राहिले व ते सोडविण्याचा त्यांनी नेहमीच प्रयत्न केला. समाजातील वेगवेगळ्या स्तरातील माणसांच्या समस्या, सुख-दुःख, जीवनानुभव यांना मूर्तरूप देण्याचे काम त्यांनी अतिशय संयत व प्रगल्भपणे केले आहे. प्रशासनात त्यांच्या मधला अधिकारी जेवढा सजग आहे तेवढाच लेखनाच्या बाबतीत लेखक म्हणून ते सजग आहेत.

प्रशासनात काम करत असतांना प्रशासनातील भ्रष्टाचार, राजकारण, अधिकारी आणि राजकर्त्यांकडून शासन व्यवस्थेचा घेतला जाणारा गैरफायदा, या सगळ्यांचे अनुभव त्यांना येत होते. तसेच भारताच्या सामान्य माणसाचे प्रश्न, शोषण, वेदना या व्यवस्थेमुळे निर्माण झाले आहेत, त्या दूर करणे आपले काम आहे. असे समजून त्यांनी प्रशासकीय सेवा केली. तसेच आपल्या साहित्यातूनही त्यांनी या सर्वांचा वेध घेतलेला आहे. पाणी प्रश्न, स्त्रीभ्रूणहत्या, बालमजुरांचा प्रश्न ते आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंतचा अवकाश त्यांनी आपला लेखनातून व्यापला आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांनी कथा, कादंबरी, नाटक, प्रशासनपर साहित्य व ललित लेखन अशा वाङ्मयाच्या विविध प्रकारातून लेखन केले आहे. प्रस्तृत शोधनिबंधात त्यांच्या साहित्यातून चित्रित झालेल्या सामाजिक समस्यांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या-**

**०१) भ्रष्टाचारी व्यवस्थेचे चित्रण :**

लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या काही साहित्य कृतींमधून भ्रष्टाचारी व्यवस्थेचे चित्रण केलेले आहे. **`ऑक्टोपस`** या कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी महसूल खाते व त्यातील प्रशासकीय यंत्रणा त्यात वावरणारे भ्रष्ट नोकरदार, त्यांचा वापर करून घेणारे राजकारणी यांचे चित्रण केले आहे. अशा भ्रष्ट समाजव्यवस्थेत काम करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याचे कौटुंबिक भावजीवन, त्याची होणारी ओढाताण व ताणतणावावर संवेदनशीलतेने लिहिले आहे. भ्रष्ट व्यवस्थेत राहून त्याविरोधात उभे राहणे प्रसंगी झुंज देणे हे ध्येयवादी अधिकाऱ्याला किती कठिण असते हे या कादंबरीतून मांडले आहे.

**`अंधेरनगरी`** या कादंबरीतून **`महानगरपालिका`** या शहराच्या संस्थेचे चित्रण अतिशय सर्जनशीलतेने केले आहे. राजकारण आणि प्रशासनातील एक वेगळ्या पैलूवर ही कादंबरी प्रकाश टाकते. प्रस्तृत कादंबरीतून सत्तेसाठी वाट्टेल ते या नीतीचा अवलंब कसा केला जातो. हे मांडले आहे.



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

**०२) बालमजुरी समस्येचे चित्रण:**

लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या **`हरवलेले बालपण`** या कादंबरीत बालमजुरी या समस्येचा वेध घेतलेला आहे. बालमजुरी करत असलेल्या मुलांच्या सर्वांगीण शोषणाचे अस्वस्थ करणारे दर्शन यामध्ये आहे. बालकामगारांचे गरीबपण, निराधारपण, हतबलता, संबंध कादंबरीभर पसरून राहिली आहे. आपल्या अवतीभोवती लहानमुलं काही काही प्रकारचे काम करताना आपण बघतो. पण ही एक समस्या आहे, एवढंच नव्हे तर, एक गंभीर समस्या आहे आणि ती सर्वत्र आहे याचे भान ही कादंबरी संवेदनशील वाचकाला घडवते.

प्रस्तृत कादंबरीतून बालमजुरी करणाऱ्या मुलांचे करपलेले जीवन आणि सर्वांगीण शोषण सविस्तरपणे आणि प्रभावीपणे मांडले आहे. हॉटेल, ढाबे, वीटभट्टी, फटाक्यांचे कारखाने, रॉकेल विक्री, बालवेश्यागृहे, बांधकाम, जरीचे काम अशा अनेक ठिकाणी ही अमानुष बालमजुरी राजरोसपणे चालू असते आणि अशा ठिकाणी या मुला मुलींचे नुसते आर्थिक शोषनच नव्हे तर लैंगिक शोषण ही होत असते असे अनेक प्रसंग कादंबरीत चित्रित करण्यात आले आहे. या व्यवसायात ही मूले कुठून येतात? का येतात? कशी येतात? अशा अनेक प्रश्नांचा वेध घेऊन अरूण पालिमकरसारख्या निस्वार्थी आणि समर्पित वृत्तीच्या कार्यकर्त्यांच्या **`स्वप्नभूमी`** या संस्थेच्या माध्यमातून बालमजुरांसाठी अनेक प्रकल्प निश्चित पथदर्शी ठरू शकतील असा सकारात्मक दृष्टीकोन ही कादंबरी दाखवते.

**०३) स्त्रीभ्रूणहत्या समस्येचे चित्रण :**

स्त्रीभ्रूण हत्या या सामाजिक ज्वलंत प्रश्नावर लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या **`सावित्रिच्या गर्भात मारलेल्या लेकी`** या कथासंग्रहाच्या माध्यमातून भाष्य केलेली आहे. या संग्रहात आठ कथा आहेत. २१ व्या शतकातही पुरूषप्रधान संस्कतीच्या आहारी गेलेलेस्त्री-पुरूष, वैद्यकीय क्षेत्रातील माणसांमधील पशुत्व, त्यांचे वर्तन वाचकाला अस्वस्थ करणारे आहे.

या कथासंग्रहातील कथांमधून धूर्त, लबाड, क्रूर, निर्दयी माणसं भेटतात. त्यांच्या सामाजिक रूढी-परंपरा, त्यांचा सनातन दृष्टीकोन जीवनाविषयी अनुभूती वाचल्यावर मनात तिरस्कार निर्माण होतो.

या संग्रहातील शीर्षक कथा गर्भात असणाऱ्या मुलींच्या स्वगताच्या माध्यमातून इथल्या समाजव्यवस्थेला हादरे देणारे प्रश्न उपस्थित करते.

`स्त्रीभ्रूण हत्या` या भीषण समस्येच्या मागे फक्त पुरूषप्रधान मानसिकता कारणीभूत आहे. याच मानसिकतेने असंख्य मुलींचा गर्भातच बळी गेला आहे. ``मुलगी नकोच नको, या पुरूषी मनोवृत्तीन मारलय हे व्यापक अर्थानं अधिक खरं आहे.`` (पृ. १२६) या मनोवृत्तीच्या परिवर्तनासाठी हा लेखन प्रपंच आहे. सामाजिक बदलाची प्रक्रिया मानसिकते पासून सुरू होते. समाजाची मानसिकता बदलावी `नकोशी` वाटणारी मुलगी प्रत्येकाला हवी हवीशी वाटावी असा प्रगल्भ सामाजिक दृष्टीकोन देणारा हा कथासंग्रह महत्वाचा आहे.

**०४) पाणी प्रश्नाचे चित्रण :**

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या काही कथासंग्रहांमधून महाराष्ट्रातील भीषण पाणी टंचाईचे वास्तव दिसून येते. यात त्यांचा **`पाणी! पाणी!!`** हा महत्वाचा कथासंग्रह आहे. २००७ साली त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाला. या संग्रहाची पहिली आवृत्ती १९९७ ला **`उदक`** या नावाने प्रसिद्ध झाली होती.

**पाणी! पाणी !!** या संग्रहाला **`तहानलेल्या महाराष्ट्राच्या कथा`** असे उपशीर्षक आहे. या संग्रहात १४ कथा आहेत. यामधून पाण्याचे असमान वाटप, दुष्काळामुळे ग्रामीण समाजाची पाण्यासाठी होणारी ओढातान मांडली आहे. **पाणी चोर** या पहिल्या कथेत ऊसतोड कामगारांचे जीवन रेखाटले आहे. पाण्या अभावी आपला ऊस जळून जातो. नाईलाजाने ऊसतोड मजूर म्हणून काम करावे लागते. अशा **`महादू`** या व्यक्तिरेखेभोवती कथा फिरते.

**`खडकात पाणी`** या कथेतून **`आकाशवाडी`** या छोट्याशा गावातील तीव्र पाणी टंचाईचे चित्रण केले आहे.



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

**`कंडम`** या कथेतून पाणी प्रश्नाबरोबरच सामाजिक वर्गव्यवस्थेचे चित्रण आलेले आहे. गावातील वजनदार व्यक्तीच्या घरी कधीच पाण्याची टंचाई नसते. परंतु गोरगरीब जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी दैनंदिन संघर्ष करावा लागतो. तसेच गावातील हरिजनांसाठी पाण्याची दुसरी विहिर असते. त्यावरच त्यांनी पाणी भरायचे यातून माणसांमाणसांमधील भेदाचे चिंतनशील चित्रण केलेले आहे.

**`नारूवाडी`** या कथेतून पाणी प्रश्नाबरोबरच आरोग्याचाही प्रश्न मांडलेला आहे.

**`गाव विकणे आहे`** या २०१८ साली प्रकाशित कथासंग्रहातूनही ग्रामीण जीवनाची पाण्यासाठी होणारी हेळसांड चित्रित केलेली आहे. या संग्रहात १० कथा आहेत. यातील आकांत - वांझोट्या प्रक्षोभाचा, बाटगी विहीर, या कथामधून तीव्र पाणीटंचाईची समस्या मांडली आहे.

**०५) दुष्काळाचे चित्रण :**

लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या साहित्यातून विविध सामाजिक समस्यांना मुखर केलेले आहे. यातीलच एक महत्वाची समस्या म्हणजे दुष्काळ. त्यांनी **`गाव विकणे आहे`** या कथासंग्रहातून दुष्काळाची भीषणता समोर आणली आहे. या संग्रहातील शिर्षक कथेतून **`वाडी`** या गावाची दुष्काळामुळे होणारी मसनवाडी चित्रित केली आहे. सततच्या दुष्काळामुळे गावातील ग्रामपंचायत अख्खा गाव विकण्याचा ठराव करतात. गावची जमीन, जनावरे, स्वतःच्या किडण्या, गावातील देव या सर्वांना विकण्याचा ठराव करतात. यामुळे प्रशासन जागे होते व आश्वासनावर बोळवण करते. तीव्र दुष्काळामूळे होणारी उपासमार, कर्जबाजारीपण, शेतकरी विरोधी धोरणे, यामुळे शेतकरी पुर्णपणे कोलमडला आहे. प्रस्तृत कथेतून गरीब भारताचे संवेदनशीलपणे चित्रण केले आहे.

**०६) नक्षलवादी समस्येचे चित्रण :**

लक्ष्मीकांत देशमुख यांनी महाराष्ट्रासमोरील एक महत्त्वाचा प्रश्न `नक्षलवाद` यावरही काही कथालेखन करून नक्षलवादी चळवळीसंबंधी चित्रण केलेले आहे. **`गाव विकणे आहे`** या कथासंग्रहातील काही कथांमधून नक्सली जीवनाचे अंतरंग त्यांनी उलगडून दाखविले आहे. **`बाप-लेक`** या कथेत **अप्पाराव व मुरली** या बापलेकाच्या माध्यमातून नक्सली चळवळी, त्यांच्या अंतर्गत असलेला संघर्ष, नक्सलींचा माओविचार उलगडून दाखवला आहे. या लोकांची क्रांतीसाठी चाललेली धडपड, आम्हाला ही विकास हवा आहे यासाठी शासनासोबतच संघर्ष याचे चित्रण करून त्यांनी आप्पाराव या पात्राच्या माध्यमातून नक्षली लोक हे पोलिसांना शरण आले तर चांगल्या पद्धतीने जीवन जगू शकतात हा आशावादही मांडला आहे. म्हणजे आत्मसमर्पणाचा एक चांगला पर्याय असल्याचे चित्रित केले आहे.

**`बस्तरची कन्या`** या कथेत आदिवासींच्या शोषणाचे चित्रण आले आहे. यात विशेषतः आदिवासी स्त्रीयांवर होणारा अन्याय, अत्याचार मांडला आहे. यामूळे आदिवासींचा नक्षलवादाकडे वाढणारा कल, विकासाच्या नावाखाली त्यांची जल-जमीन-जंगल भांडवलदारांना देऊन आदिवसींना उघड्यांवर आणने रोगापेक्षा ईलाज भयंकर या न्यायाने नक्षलवाद्यांच्या कुटुंबाची अवस्था करणे.

अशा वेगवेगळ्या समस्या मांडून संविधानाने दिलेला समानतेचा हक्क आदिवासींच्या हितासाठी समान राबवावा व त्यांनाही मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अत्याचार न करता एक सकारात्मक भावनेने प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सूचितही केले आहे.

**साहित्याचे विशेष :**

१) लक्ष्मीकांत देशमुख यांचे साहित्य माध्यमवर्गीयांच्या चौकटीत न अडकता सामाजिक प्रश्नांभोवती केंद्रीत होऊन सामान्य माणसाच्या सुख-दुःखाची अभिव्यक्ती करू लागते.



Scanned with CamScanner

२) `प्रबोधन मूल्याचे वाहक असणारे साहित्य माणसांना विशिष्ट सामाजिक प्रश्नांविषयी जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात.`

३) साहित्याचा स्थायी भाव लोककल्याणाचा आहे.

४) साहित्यातून समाजजीनाचे वस्तुनिष्ठ असे चित्रण आलेले आहे.

५) सामाजिक समस्यांच्या चित्रणाबरोबरच त्या सोडविण्याचे मार्गही प्रभाविपणे मांडले आहे.

**सारांश :**

लक्ष्मीकांत देशमुख यांचे साहित्य विविध सामाजिक प्रश्नांच्या कलात्मक अभिव्यक्तीतून समाजाला नवी दृष्टी प्रदान करण्याबरोबरच आत्मचिंतन करायलाही भाग पडते. त्यांच्या सामाजिक चिंतनामध्ये नव समाजनिर्मितीची कूस आहे. त्यांच्या मते राजकारण हे समाजाच्या चांगला आणि सुखीजीवनासाठी आवश्यक आहे. परंतु राजकारण आणि समाजकारण यांच्यातील द्वैत ते मान्य करून या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत हे त्यांचे आग्रहाचे सांगणे आहे.

एकुणच लक्ष्मीकांत देशमुख यांनी केलेले राजकिय व सामाजिक चिंतन हे नवसमाजास उपयुक्त असे असून साहित्यातून केलेले वास्तव चित्रण विचार करायला लावणारे आहे.

**संदर्भ ग्रंथः**

१. अन्वयार्थ - संपादक - डॉ. रणधीर शिंदे
२. सावित्रिच्या गर्भात मारलेल्या लेकी - लक्ष्मीकांत देशमुख
३. पाणी ! पाणी ! - लक्ष्मीकांत देशमुख
४. गाव विकणे आहे - लक्ष्मीकांत देशमुख
५. ऑक्टोपस - लक्ष्मीकांत देशमुख
६. अंधेरनगरी - लक्ष्मीकांत देशमुख
७. हरवलेले बालपण - लक्ष्मीकांत देशमुख



Scanned with CamScanner